# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.१७/०४/२०१९

## दि.१६/०४/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुश्रृंगी पो स्टे ४०९/१९,भादविक ३०७,३४,महा.पो.का.क.३७(१)१३५ |
| **फिर्यादी** | अक्षय सोळंकी,वय-२३,रा.पवारनगर,जुनी सांगवी,पुणे |
| **आरोपी** | एकुण चार इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०४/२०१९ रोजी रात्रौ २१/४५ वा.चे पुर्वी शंकर मंदिरा जवळ,राजीव गांधी पुला शेजारी सार्वजनिक रोडवर औंध,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा भाऊ रोशन मुरलिधर सोळंकी,वय-१७ वर्षे,रा.शकुंतला निवास घर नं. २,पवारनगर,जुनी सांगवी,पुणे यास पाच ते सहा महीन्या पुर्वी झालेल्या भांडणाच्या कारणा वरुन यातील नमुद इसमांनी संगनमत करून,रोशन यास कोयत्याने डोक्यात,खांदयावर दोन्ही हाताच्या मनगटावर कोयतयाने वार करुन,त्यास जीवे ठार मारण्याच्या प्रयत्न केला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. टी.एम.फड ९८२३०५७१४१ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे १६४/१९,भादविक २७९,३३७,३०४(अ),मोव्हेॲक्ट ११९/१७७ |
| **फिर्यादी** | आर.सी.चौधरी, पो.हवा. वारजे पोलीस स्टेशन पुणे |
| **आरोपी** | रुबीऊल शामसुलआलम शेख,वय-२५,रा.पिंपळे-निलंख,गणेशनगर,पुणे (मयत) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/१०/२०१८ रोजी रात्रौ ००/३० वा. वारजे मुठा ब्रीजवर वारजे,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद मयत इसम रुबीऊल शामसुलआलम शेख याने त्याचे ताब्यातील दुचाकी ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात बेदरकारपणे स्वतःचे डोक्यात हेल्मेट न घालता चालवुन,नमुद ठिकाणी वारजे नदीचे ब्रीज वरील फुटपाथचे साईडला असलेल्या डिव्हायडरला स्वतः धडकुन,त्यामध्ये त्याचे डोक्यास गंभीर दुखापत होवुन,रूबीऊल हा स्वतःचे मृत्युस कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. एम.जी.त्र्यंबके ९८६०३७०१५१ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ४१०/१९,भादविक ४०६,४२०,४६७,४६८,४६९ |
| **फिर्यादी** | एक इसम,वय-३० वर्ष,रा.केशवनगर,चिंचवड गाव,पुणे |
| **आरोपी** | एक इसम,रा.सुरजबन सोसायटी समोर,जुणवने शाळा,औंध,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/११/२०१८ रोजी ते आजपावेतो एस.के.ग्रुप,कार बाजार,मोटार वर्ल्ड,५०१,बी.विंग,पाचवा मजला,भक्ती प्लाझा, ब्रेमन चौक,औंध,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे चाकण येथील खाजगी कंपनी मध्ये मॅनेजर म्हणुन नोकरीस असुन,त्यांना स्वतःचे वापरासाठी कार घ्यावयाची असल्याने,त्यांनी ओएलएक्स या वेबसाईडवर चारचाकी गाडयांची महिती घेतली असता,यातील नमुद इसमाने दिलेल्या कार बाजार कंपनीची जाहिरात पाहुन नमुद इसमाचे ऑफीस येथे संपर्क करुन केला असता,सदर इसमाने फिर्यादी यांना तो फोर्ड कंपनीचा ऑथराईझ्ड डीलर असुन,तुम्हाला कंपनीची इको स्पोर्ट कार कमी किमंतीत देतो असे आमिष दाखवुन,मोटार वर्ल्ड प्रा.लिमी.बेंगलोर यांचे नावाने पैसे स्विकारल्याची बनावट रिसीट देवुन,फिर्यादी यांचेकडुन कार्ड,चेक तसेच आरटीजीएस व्दारे ४,४०,०००/- रुपये व फिर्यादी यांची बँकेकडुन मंजुर झालेले कार लोनची ६,००,०००/- रूपये रक्कम इसमाने त्याचे बँकेचे खात्यात घेवुन,सदरचे पैसे फोर्ड कंपनीस न देता,ते पैसे फिर्यादी यांचे आर्थिक नुकसान व्हावे या उद्देशाने,स्वतःचे फायद्याकरिता वापरुन,फिर्यादी यांची एकुण १०,४०,०००/- रुपयेची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. बी.व्हि.दोडमिसे ९५०३७५८२८४ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ३१५/१९,भादविक ४२०,४६५,४६७,४६८,४७१,५०६(२),३४ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-५६ वर्षे,रा.धनकवडी,पुणे |
| **आरोपी** | एकुण १५ इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/०१/२००८ रोजी सह. दुय्यम निबंधक कार्यालय हवेली-२०,पुणे येथे |
| **तपशिल** | मौजे धायरी स.नं.१४९,हिस्सा नं.८,अ/1,मध्ये १० गुंठे जमीन मधील जमीनीची एका डेव्हल पर्सचे भागीदार यांना विक्री केली असल्याचे माहिती असताना देखील,यातील नमुद इसमांनी सदर जागा मालक व इतर नातेवाईक यांचेशी संगनमत करून,फिर्यादीस सदरची जागा ही निर्धोक व क्लीअर टायटल आहे असे भासवुन,ती जागा सह दुय्यम निबंधक कार्यालय,हवेली-२०,पुणे यांचे कार्यालयास विकसन करारनामा व कुलमुखत्यार दस्त अन्वये बनावट दस्त तयार करून देवुन,मुद्रांक शुल्क २,०९,०००/- रूपये, नोंदणी फी शुल्क ३०,४६०/- रूपये, इतर दोन इसमांना कमीशनकरीता रक्कम रू १,००,०००/- रूपये तसेच जागा मालक यांना जागेच्या बदल्यात ३०,००,०००/- रूपये अशी एकुण ३३,३९,४६०/- रूची फसवणुक केली. तसेच फिर्यादी यांची झालेल्या फसवणुकीबाबत त्यांनी त्यांचे दांडेकर पुल येथील कार्यालयात विचारणा करणेकरीता गेले असता,त्यांनी फिर्यादीस ''ती आमची माणसे आहेत,मीच तो व्यवहार करण्यास सांगीतला आहे. मी नुकताच एका नगरसेवकाचा खुन केलेला आहे. तुम्ही पुन्हा आमचे ऑफीस मध्ये आला तर तुम्हाला जीवे ठार मारीन'' अशी धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. केसरकर |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दत्तवाडी पो स्टे २१९/१९,भादविक ३०४(अ) |
| **फिर्यादी** | अशोक शिळीमकर,वय-३५ वर्षे,रा.जनता वसाहत,पुणे |
| **आरोपी** | महाराष्ट्र राज्य विदयुत महामंडळचे सेक्शन इंजिनिअर व लायनमन (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिं.१५/०४/२०१९ रोजी १७/३० वा.गल्ली नं.२९ समोर,सांळुखे दवाखान्या जवळ,जनता वसाहत,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद महाराष्ट्र राज्य विदयुत महामंडळचे सेक्शन इंजिनिअर व लायनमन यांनी नमुद ठिकाणी असलेले विदयुत मंडळाचे इलेक्ट्रिक खांबाची रेग्युलर तपासणी न केल्यामुळे,त्याचप्रमाणे इलेक्ट्रिक पोलकडे दुर्लक्ष करून,हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्या मुळे,सदर इलेक्ट्रिक खांबास इलेक्ट्रिक करंट येवुन,फिर्यादी यांची मुलगी कु.गौरी अशोक शिळीमकर,वय-११ वर्षे,रा.गल्ली नं.१८,जनता वसाहत,पुणे हि खेळत असताना,तीस शॉक लागुन त्यामध्ये तीचा मुत्यृ झाला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, एन.आर.केंचे ९८२३९००५१२२ |

## <u>दि.१७/०४/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे १५५/१९,भादविक ३०७,ऑर्म्स ॲक्ट कलम (३)२५ (४)२५ |
| **फिर्यादी** | सचिन जगदाळे, पो.शि. विश्रामबाग पोलीस स्टेशन,पुणे शहर |
| **आरोपी** | सिध्दराम विजय कलशेट्टी,वय-२३ वर्षे,रा.अक्कलकोट एस.टि.स्टॅन्ड जवळ,अक्कलकोट,जि. सोलापुर (मयत) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०४/२०१९ रोजी २०/४५ ते २३/१० वा.चे दरम्यान आनंदी निवास,१६१८,सदाशिव पेठ, पुणे या बिल्डींगचे टेरेसवर व इमारतीचे डक्ट मध्ये |
| **तपशिल** | यातील ॲसिड हल्ल्यातील व गोळीबारातील जखमी इसम रोहीत थोरात याचे आईने यापुर्वी यातील नमुद मयत इसम सिध्दराम विजय कलशेट्टी याचेविरूध्द विश्रामबाग पो. स्टे. येथे गुन्हा दाखल केल्याचा मनात राग धरून,सिध्दराम कलशेट्टी याने केलेल्या रोहित विजय थोरात,रा.स्वप्नगंधा बिल्डींग,गोपाळ गायन समाज रोड,सदाशिव पेठ,पुणे यास जीवे मारण्याचे उद्देशाने, त्याचेवर ॲसिड हल्ला व अग्निशस्त्राने फायर करून,त्यास गंभीर जखमी केले. |

| | |
|---|---|
| | त्या अनुषंगाने सदर वेळी फिर्यादी हे त्यांचे बरोबरील पोलीस स्टाफसह हत्याचा शोध घेत असताना,पोलीसांनी त्यास ताब्यात घेवु नये म्हणुन त्याने स्वतः पळून जाण्याकरीता पोलीस पथका पैकी कोणाचातरी जीव घेण्याचे उददेशाने,त्याचेकडील अग्निशस्त्राने पोलीस पथकातील पोलीसांवर जाणिवपुर्वकदोन राऊंड फायरकरून पोलीसांवर प्राणघातक हल्ला केला. तसेच त्यास स्वतः पळुन जाता येणार नाही याची खात्री झाल्यानंतर त्याने स्वतः त्याचे कडील अग्निशस्त्राने स्वतःचे कपाळावर मध्यभागी एक राऊंड फायर करून सिध्दराम हा स्वतःचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. सुनिल कलगुटकर ९८९२२३८५९७ |
| **२** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे १५४/१९,भादविक ३०७,ऑर्म्स ॲक्ट कलम (३)२५ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२३ वर्षे,रा.नवी पेठ,पुणे |
| **आरोपी** | सिध्दराम विजय कलशेट्टी,वय-२३ वर्षे,रा.अक्कलकोट एस.टि.स्टॅन्ड जवळ,अक्कलकोट,जि. सोलापुर (मयत) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०४/२०१९ रोजी २०/४५ वा.स्वप्नगंधा बिल्डींगचे गेट जवळ,गोपाळ गायन समाज रोड, सदाशिव पेठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया रोहित विजय थोरात याचेबरोबर बोलत थांबले असताना,यातील नमुद इसम सिध्दराम विजय कलशेट्टी याने कोणत्यातरी अज्ञात कारणावरुन,रोहित विजय थोरात याचे अंगावर अचानक ॲसिड फेकुन,त्याचे पाठीवर गावठी पिस्टलने फायर करुन,रोहित थोरात यास जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.एम.परगेवार ९८२८८४६५९१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**